भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०९/२०१७

**१) संगनमत करुन लाकडी काठीने डोक्यावर हाताचे करंगडीवर व दगडाने डावे गालावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे १५.०० वा दर. यातील फिर्यादी प्रविण दुर्योधन शेंडे वय २८ वर्ष, रा. केसवाडा वाघ याने आरोपी क्र. २ ला बोलला की तु रात्री कशाला ईकडे तिकडे फिरतेस असे बोलल्यावर आरोपी क्र. १ ला सांगीतले असता आरोपी क्र. १ ने माझी पोरगी अशी करीत नाही म्हणुन भांडण, संगनमत करुन फिर्यादीला लाकडी काठीने डोक्यावर, डावे हाताचे करंगडीवर मारले व आरोपी क्र. २ उजवे हाताने दगड फिर्यादीचे डावे गालावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे १५.०० वा दर. यातील फिर्यादी दुर्योधंन महादेव शेंडे वय ६० वर्ष, रा. केसवाडा वाघ यांनी आरोपीला हटकले की तु माझ्या मुलीला शिवीगाळ का करतोस त्यावर आरोपीने भांडण करुन फिर्यादीचे डोक्याचे मागील बाजुस दगडाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सतांपे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) नाली खोल केल्याचे कारणावरुन कुऱ्हाडीचे लाकडी दांडयाने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे १७.०० वा दर. यातील फिर्यादी सौ. हेमलता श्रीकृष्ण हारगुडे वय ३५ वर्ष, रा. कवडसी/गायडोंगरी हिचे पती श्रीकृष्ण हारगुडे वय ४० वर्ष, यांचे सोबत यातील आरोपीनतामध्ये आरोपीच्या घरासमोरील सरकारी सिमेंटच्या नालीचे आरोपी क्र. १ ने कठडे फोडुन नाली खोल केल्याचे कारणावरुन भांडण झाल्याने दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे पतीस ढकलढुकल करुन शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ ने त्याचे घरातुन कुऱ्हाड घेवुन येवुन फिर्यादीला लाकडी दांडयाने फिर्यादीचे डोक्याचे मागील बाजुस मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील. तपास पोना. बिसने पो.स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) जमीनीचे पैश्याचे वादावरुन भांडण व शिवीगाळ करुन विटाने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०९/२०१७ चे १७.३० वा दर. यातील फिर्यादी सोमेश्वर अन्नाजी पोगडे वय ३२ वर्ष, रा. पवना बु. हा आपले पत्नीसह आपले आई—वडीलाचे घरी राहण्यास गेला असता फिर्यादीने आरोपीला माझ्या हिस्याचे विकलेल्या जमिनीच्या पैश्याचा हिस्याचे विकलेल्या जमीनीच्या पैश्याचा हिशोब करु म्हणुन बोलला असता जमीनीचे पैश्याचे कारणावरुन यातील आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीसह भांडण, शिवीगाळ करुन फिर्यादीचे डोक्यावर विटाने मारुन जखमी केले व फिर्यादीचे डोक्याचे केस ओढतान करुन दोघांनाही जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३२३,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयावर धाडी .  :—**

दिनांक १४/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, तुमसर व आंधळगाव येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ६७ लिटर हा.भ. दारू किंमती ६२००/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.